# प्रवेश प्रक्रिया माहिती

- ❖ डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठातील पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया साधारणत: राज्य सामायिक प्रवेश प्रक्रिया म्हणजेच (MHT-CET/JEE/NEET) चा निकाल जाहिर झाल्यानतंर १५ दिवसाच्या आत सुरू होते.
- ❖ प्रवेश अर्ज ऑनलाईन सादर करावा लागतो. प्रवेश अर्ज ऑनलाईन सादर करण्याची लिंक विद्यापीठाच्या (dbskkv.org) या वेबसाईटवर प्रवेश अर्ज सुरू झाल्यानंतर उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच ऑनलाईन प्रवेश अर्जाची लिंक महाराष्ट्र कृषि व संशोधन परिषद, पुणे (mcaer.org) यांच्या वेबसाईटवर देखील उपलब्ध असेल.
- ❖ प्रवेश प्रक्रियेमध्ये कोकण विभागातून उच्च माध्यमिक शालान्त परिक्षा (HSC) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना एकुण जागेच्या ७० टक्के जागा प्रवर्ग निहाय राखीव असतात व कोकण विभाग सोडून उच्च माध्यमिक शालान्त परिक्षा (HSC) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना ३० टक्के जागा प्रवर्ग निहाय राखीव असतात.
- ❖ **प्रवेश अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे**
  - ➢ सामायिक प्रवेश परिक्षेचे गुणपत्रक/गुणपत्रके (MHT-CET/JEE/NEET)
  - ➢ माध्यमिक शांलान्त (SSC) गुणपत्रक, प्रमाणपत्र
  - ➢ उच्च माध्यमिक शालान्त (HSC) प्रमाणपत्र, गुणपत्रक
  - ➢ महाराष्ट राज्यातील सक्षम प्राधिका—याने दिलेले अधिवास (Domicial) प्रमाणपत्र
  - ➢ शाळा सोडल्याचा दाखला
  - ➢ जात प्रमाणपत्र
  - ➢ जात वैधता प्रमाणपत्र
  - ➢ जमीन असल्याचा चालू वर्षातील ७/१२
  - ➢ ओबीसी प्रर्वतील विद्यार्थ्यांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non-Creamy Layer)
- ❖ ऑनलाईन प्रवेश अर्ज सुरू झाल्यानंतर प्रवेश अर्जाची माहिती पुस्तिका मराठी व इंग्रजी दोन्ही भाषेमध्ये https://cetcell.mahacet.org या साईटवर उपलब्ध असेल. सदरची माहितीपुस्तिका प्रवेश अर्ज भरणा—या विद्यार्थ्यांनी व पालकांनी डाउनलोड करून प्रिंट काढून घ्यावी व त्याचे काळजीपूर्वक वाचण करावे जेणेकरून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरताना महाविद्यालयांचे सांकेतांक क्रमांक भरणे व आपल्या आवडीचे महाविद्यालय निवडणे सोयीचे होईल.
- ❖ प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यांना हॉस्टेल/वस्तिगृह विद्यार्थ्यांच्या मेरिटनुसार देण्यात येईल.
- ❖ अधिक माहितीसाठी संपर्क उच्चस्तर परिक्षा शाखा,दापोली (०२३५८—२८३९६३) वेळ ९.०० ते १७.३०